**नि.दि.दा.क्रं. ६०/२०१८**
**परसराम वि. गणेशप्रसाद**
**नि. ६५ पुढे..**

**<u>वादीतर्फे साक्षदार क्र.१-डी यांचा सरतपास वादीतर्फे विधिज्ञ के.जे.महाजन यांच्या मार्फत सुरु :</u>**

**१४.** माझ्या शपथपत्रातील मजकूर माझ्या वकीलांनी माझे सांगण्याप्रमाणे लिहीले असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. माझे सरतपास शपथपत्रावर माझी सही असुन त्यावर मी वाचुन व समजून सही केली आहे. मी पुराव्याकामी अभिलेखावर दस्तऐवज यादी **<u>निशाणी क्र.६७</u>** अन्वये खालील दस्त दाखल केले आहे.

**१.** मी अभिलेखावर माझे वडिल यांनी तहसीलदार, वर्धा यांच्या समोर प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. त्यावर माझे वडिलांची सही आहे. ती मी ओळखते. (प्रतिवादी क्र.१ ते ५ ने प्रस्तुतच्या प्रतिज्ञापत्रास निशाणी देण्यास आक्षेप नोंदविला, साक्षीदाराने सदरचा प्रतिज्ञापत्रावर तिच्या वडिलांची सही आहे व ती सही साक्षीदार ओळखत असल्याचे सांगितले, करिता सदरचा प्रतिज्ञापत्रास ओळखीपुरता निशाणी देण्यात येत आहे.) सदरचा प्रतिज्ञापत्रास **<u>निशाणी क्र.६८</u>** देण्यात येते.

**२.** मी अभिलेखावर भुमी अभिलेख कार्यालय, सेलू, यांनी दिलेली अधिकार अभिलेख पंजीची प्रत दाखल केली आहे. त्यास **<u>निशाणी क्र.६९</u>** देण्यात येते.

**३.** मी अभिलेखावर फेरफार क्र.१३४ व ५-अ ची प्रत दाखल केली आहे. त्यास अनुक्रमे **<u>निशाणी क्र.७० व ७१</u>** देण्यात येते.

**४.** मी अभिलेखावर माझे वडिलांचे पॅन कार्ड व मतदान कार्डाची सत्यापित प्रत दाखल केली आहे. त्यास अनुक्रमे **<u>निशाणी क्र.७२ व ७३</u>** देण्यात येते.

**नि.दि.दा.क्रं. ६०/२०१८**

**परसराम वि. गणेशप्रसाद**

**नि. ६५ पुढे..**

**५.** मी अभिलेखावर सर्वे क्र.१३५ चा रिनंबरीग पर्चा दाखल केला आहे. त्यास **निशाणी क्र.७४** देण्यात येते.

**६.** मी अभिलेखावर उपविभागीय अधिकारी, वर्धा यांच्या कडील निकालपत्राची फोटो कॉपी दाखल केली आहे. त्यास **आर्टिकल-अ** देण्यात येते.

**७.** मी अभिलेखावर मौजा किन्हाळा, सर्वे क्र.४१/३क/४१/४क/४१/५ख/४०/६ख व ६०ख (बंदोबस्त योजनेप्रमाणे) सातबारा उता-याची प्रत दाखल केली आहे. त्यास **निशाणी क्र.७५** देण्यात येते.

**८.** मी अभिलेखावर माझे वडिलांचा नावाचा बदलाबाबतचे राजपत्र दाखल केले आहे. त्यास **निशाणी क्र.७६** देण्यात येते.

**सरतपास संपला**

**उलटतपास : वादी व प्रतिवादींतर्फे विधीज्ञ यांची तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

**दि.** ११/०२/२०२६

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.02.11 17:31:43 +0530

(एस.आर.सातभाई)

दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,

सेलू.